**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,**
३०२,वेक फिल्ड हाऊस,३रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट,मुंबई४००००१.
दूरध्वनीक्र.०२२-२२६९४९८४/८५, Email:dcfmangrovecell@gmail.com/konkanmangroves@gmail.com

**विषय**:- कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या १५ व्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र.कक्ष-१/ल.ले/ ०७ /सन २०२०-२१
फोर्ट, मुंबई ४००००१, दिनांक: १४.०५.२०२१.

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
३. मुख्यवनसंरक्षक (प्रादेशिक) ठाणे.
४. श्री. डी. आर.पाटील , विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई.
५. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
६. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे/ नवी मुंबई यांचे प्रतिनिधी.
७. आयुक्त, महानगरपालिका बृहन्मुंबई / ठाणे / कल्याण-डोंबिवली /मिरा-भाईंदर /वसई-विरार / नवीमुंबई / पनवेल /भिवंडी-निजामपूर/उल्हासनगर यांचे प्रतिनिधी. (उपआयुक्तवत्यावरीलदर्जाचेअधिकारी)
८. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर किंवा त्यांचे प्रतिनिधी (विभागीय वन अधिकारी व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
९. पोलीसअधिक्षक,ठाणे (ग्रा)रायगड/पालघर/रत्नागिरी/सिंधुदुर्ग यांचे प्रतिनिधी (पोलीस उपअधिक्षक व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
१०. सदस्य सचिव, महाराष्ट्र सागर तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA)
११. श्री. अशोक वाघाये, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) चे प्रतिनिधी.
१२. श्री. प्रमोदपाटील, शहरआणि औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO) चे प्रतिनिधी.
१३. महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA) चे प्रतिनिधी.
१४. झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरण यांचे प्रतिनिधी.
१५. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) यांचे प्रतिनिधी.
१६. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्रिय अधिकारी.
१७. श्री. विनोदपुन्शी, नवी मुंबई एन्व्हारमेंट ऍक्शन ग्रुप यांचे प्रतिनिधी
१८. श्रीमती. हेमारमानी, बॉम्बे एन्व्हारमेंट ऍक्शनग्रुप यांचे प्रतिनिधी
१९. श्री. स्टॅलिनडी,वनशक्ती (NGO) यांचे प्रतिनिधी
२०. महाराष्ट्र मच्छिमार कृती संघ यांचे प्रतिनिधी
२१. संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS)

**संदर्भ** :- शासननिर्णयक्र. एस-३०/२०१५/अनौ.३०/प्र.क्र.४६२/फ-३,दि.१६ ऑक्टोबर,२०१८.

कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची **१५ वी** बैठक **बुधवार,** दिनांक २२.०३.२०२१ रोजी **विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली ऑन लाईन बैठक** घेण्यात आली.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने इतिवृत्तातील सूचनेप्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन कांदळवन तक्रारींबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी या कार्यालयात सादर करावा, ही विनंती.

सदस्यसचिव,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा
उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.

**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची १५ वी ऑनलाईन बैठक**
**दिनांक २२/०३/२०२१ रोजीचे इतिवृत्त**
**मा.विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.**

समितीचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन पद्धतीने सदरची बैठक घेण्यात आली. अध्यक्षांनी उपस्थितांचे स्वागत केले व समितीच्या बैठकीस सुरुवात केली. सदर बैठकीस खालील अधिकारी व व्यक्ती उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्री. राजीव निवतकर | जिल्हाधिकारी मुंबई शहर | जिल्हाधिकारी मुंबई शहर |
| २ | श्री. मिलिंद बोरीकर | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| ३ | श्री. राजेश नार्वेकर | जिल्हाधिकारी ठाणे | जिल्हाधिकारी ठाणे |
| ४ | श्रीमती निधी चौधरी | जिल्हाधिकारी रायगड | जिल्हाधिकारी रायगड |
| ५ | श्रीमती के. मंजुलक्ष्मी | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग |
| ६ | श्री. मकरंद देशमुख | उप आयुक्त (महसूल) | विभागीय आयुक्त, कोकण विभाग, बेलापूर, नवी मुंबई. |
| ७ | श्रीमती. निनु सोमराज | उप वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई. |
| ५ | निवासी उपजिल्हाधिकारी पालघर | निवासी उपजिल्हाधिकारी पालघर | जिल्हाधिकारी पालघर |
| ६ | श्री. अशोक वाघाये | एम.एम.आर.डी.ए. | एम.एम.आर.डी.ए. |
| ७ | श्री. स्टॅलिन डी. | वनशक्ती | वनशक्ती |
| ८ | श्री. प्रमोद पाटिल | नोडल अधिकारी सिडको | सिडको |
| ९ | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ | **अनुपस्थित** | |
| १० | MCZMA | **अनुपस्थित** | |

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>तक्रार</th><th>झालेली चर्चा व करावयाची कार्यवाही कांदळवन</th><th>अंमलबजावणी करणारी यंत्रणा</th></tr>
<tr><td colspan="4">क्षेत्रातील डेब्रिज काढून टाकणेबाबत.</td></tr>
<tr><td>१</td><td colspan="2">• सदरचा विषय हा गेली सहा महिन्यापासून प्रलंबित असल्यामुळे समितीने या विषयावर गार्भीर्याने लक्ष देऊन १४ हेक्टर जागेपैकी खालीलप्रमाणे १०.२२ हेक्टर जागेवरील डेब्रिज हटवून कांदळवनाची लागवड करण्याच्या सूचना दिल्या आहेत.<br>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>गावाचे नाव</th><th>अतिक्रमण तोडलेल्या झोपडी संख्या</th><th>क्षेत्र हे.</th><th>सर्वे नं.</th></tr>
<tr><td>१</td><td>मौजे विक्रोळी</td><td>२६२</td><td>०.३९३</td><td>२०९</td></tr>
<tr><td>२</td><td>मौजे घाटकोपर (छेडानगर/चेंबुर)</td><td>७२८</td><td>०.८९७६</td><td>२३६</td></tr>
<tr><td>३</td><td>मौजे माहिम</td><td>१०५</td><td>०.५</td><td>१०५/ ३४७</td></tr>
<tr><td>४</td><td>मौजे चित्ता कॅम्प</td><td>४५०</td><td>२.०</td><td>१५२</td></tr>
<tr><td>५</td><td>मौजे तुर्भे</td><td>२९०</td><td>०.४३५</td><td>१५२/ १० पैकी</td></tr>
<tr><td>६</td><td>मौजे मालवणी</td><td>१९६</td><td>४.००</td><td>२६३</td></tr>
<tr><td>७</td><td>मौजे मार्वे</td><td>६३</td><td>०.५</td><td>२६३</td></tr>
<tr><td>८</td><td>मौजे कांदिवली</td><td>१८०</td><td>१.५</td><td>१४९</td></tr>
</table>
याबाबत विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांनी २०२१-२२ या वर्षामध्ये कार्यवाही करण्याठी कांदळवन प्रतिष्ठानामार्फत अर्थसंकल्पिय तरतूद ठेवण्यात आली आहे. त्या अनुषंगाने समितीने सदरचा विषय बंद करण्याचे निर्देश दिले.</td><td>मुंबई महानगरपालिका<br>महसुल<br>वन<br>म्हाडा</td></tr>
</table>

## कांदळवन समितीच्या तक्रारींवर केलेली कार्यवाही

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>तक्रार क्र. व तक्रारीचा विषय</th><th>करावयाची कार्यवाही</th><th>अंमलबजावणी करणारी यंत्रणा</th></tr>
<tr><td colspan="4">मुंबई उपनगर जिल्हयातील कांदळवन तक्रारी</td></tr>
<tr><td>१</td><td>तक्रार क्र. १२<br>श्री. लुक मेंन्डीस<br>दि.३०.११.२०१८<br>Mangroves under threat at Bandra east below Mahim-Sion link way.</td><td>• जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्या दि.२२.०४.२०१९ रोजीच्या अहवालानुसार सदर जागा ही माहिम धारावी पूल लगत असून त्या ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून येत नाही परंतु कांदळवना लगत मोठया प्रमाणात डेब्रीज टाकलेले असून ते पुढे सरकूल कांदळवनास नुकसान होण्याची शक्यता आहे.<br>• सदर जागेवरील डेब्रिज हटविण्याची कार्यवाही अद्याप झालेली नाही असे समितीच्या निदर्शनास आले. सदर जागेवरील डेब्रिज १५ दिवसात हटवून सदर जागेवर कांदळवनाची लागवड करण्याच्या सूचना दिल्या होत्या.</td><td>बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.<br>(अहवाल अप्राप्त)</td></tr>
<tr><td>२</td><td>तक्रार क्र. २७<br>श्री. डेबी गोएंका -<br>दि.१२.१२.२०१८<br>Destruction of mangroves by INS Hamla at Marve.</td><td>• या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी Contractor विरुध्द FIR दाखल करण्यात आली आहे असे सांगितले.<br>• समितीमार्फत नेवीच्या अधिकाऱ्यांना वन संवर्धन अधिनियम (FCA) प्रस्ताव मागविण्यात आला होता परंतु अद्याप प्राप्त झालेला नाही.<br>• समितीने या तक्रारीबाबत समितीने अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या बैठकीत सदरचा विषयाबाबत चर्चा झाल्यानुसार त्यांच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.</td><td>जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>(अहवाल अप्राप्त)</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | **तक्रार क्र. ६९**<br>श्रीम. आदिती प्रधान<br>दि.२०.०४.२०१९<br>Debris dumping in Lokhandwala Mangrove in Andheri West | • या तक्रारी संदर्भात मौजे वर्सोवा येथील स.क्र. १२० अ, ही मिळकत महाराष्ट्र हौसिंग बोर्ड यांच्या मालकीची आहे. सदर ठिकाण टाकण्यात आलेले डेब्रीज हे कांदळवनाच्या क्षेत्रापासून ५० मीटरच्या आत करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभाग यांच्या कडील शासन निर्णय क्रमांक ईएनव्ही-२००१/१८३/प्र.क्र.३१/ता.क.१ दि. २५/०१/२००१ नुसार "कांदळवनाचे (खार फुटी) क्षेत्र अर्थात जमीन ज्या विभागाच्या अखत्यारित आहे, त्या विभागाने त्या क्षेत्रात कांदळवनाची अवैध कटाई/नुकसान झाल्यास संबंधित विभागाने प्रचलित नियमाप्रमाणे कारवाई करणे ही त्या विभागाची जबाबदारी राहील." असे नमुद आहे. त्यामुळे आपल्या मालकीच्या जमिनीमध्ये कांदळवनाच्या क्षेत्रापासून ५० मीटर क्षेत्राच्या आत अवैध डेब्रीज टाकणाऱ्या विरुध्द पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच सदर क्षेत्रातील कांदळवनाचा ऱ्हास कोणाकडूनही केला जाणार नाही. याची दक्षता घेण्याची देखील आवश्यकता असल्याने या संदर्भात मा. मुख्य अधिकारी मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांना आपले स्तरावरुन लिहून जाणेस विनंती आहे, असा अहवाल उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांनी दि.३०/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला आहे.<br>• सदर प्रकरणी यापुर्वीच या कार्यालयाकडील दि. १९/११/२०१८ रोजीच्या पत्रान्वये मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांना सदर ठिकाणच्या अतिक्रमण आणि कांदळवन ऱ्हासाबाबत कळविलेले आहे.<br>• **त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबात गुन्हा दाखल असल्यास याबाबत ची FIR ची प्रत समितीकडे सादर करण्याचे निर्देश दिले.** | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>(अहवाल प्राप्त) |
| ४ | **तक्रार क्र. ९१** श्रीमती. श्वेता भट, दि. १३.०८.२०१९<br>Destruction of Mangroves at Mankhurd, Mumbai, by Yogayatan Ports Pvt. Ltd. | • सदर जागेवर जेट्टीचे बांधकामामुळे कोणत्याही प्रकारच्या कांदळवनाच्या झाडाचा ऱ्हास झालेला नाही तसेच सदर ठिकाणी आवश्यक त्या संबंधीत विभागाच्या आवश्यक त्या परवानग्या घेण्यात आलेल्या आहेत, असे योगायेतन पोर्टचे प्रतिनीधी श्री. राहूल महादेव सोमकुंवर यांनी त्यांचे जाबाबात नमूद केले आहे.<br>• **तसचे सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक यांच्या अहवालानुसार सदर ठिकाणी कोठेही कांदळवन नाही, सदरची जागा ही २०१० पासून ३० वर्षासाठी भाडेतत्वावर जहाज दुरुस्तीसाठी देण्यात आली आहे.**<br>• **त्या अनुषंगाने समितीने सदरची तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले.** | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>(अहवाल प्राप्त) |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | **तक्रार क्र. ९४** दि.०१.०९.२०१९ श्री. रेजी अब्राहम Site visit by SDO and other enforcement authorities at malad malwani, lagoon road, CTS no 2841, S.no 263 on 21.07.2019 following our complaint and consequent directions by high court monitored state mangroves monitoring committee. | • या तक्रारी संदर्भात वनपरिक्षेत्र अधिकारी पश्चिम मुंबई यांच्या अहवालानुसार मालवणी सर्वे नं. २६३ पै.न. भु.क्र. २८४१ अ च्या उत्तरेस मालाड मार्वे रोड आहे. रोडच्या बाजूने दक्षिण दिशेस लगून रोड आहे. सदर रोडच्या पूर्वेस काही अतिक्रमीत दुकाने व झोपडया आहेत. सदर ठिकाणच्या मागील बाजूस हिंदु, ख्रिश्चन धर्मीयांची स्मशानभूमी आहे. दुकानाच्या दक्षिणेस एस.आर.के. ने बांधलेल्या मानवस्थळ को.हा. सो. इमारती आहे. सदर इमारतीच्या पूर्वेस कांदळवन दिसून येत आहे. तसेच टिपु सुलतान मैदानाच्या दक्षिण बाजूस टाटा पावर कंपनीची जागा असून सदर जागेत दगड सिमेंटचे बांधकाम सुरु असल्याचे दिसून आले व पश्चिमेस कुंपण भिंत आहे.<br>• सदर जागेच्या जी.पी.एस रिडींग गुगल अर्थ वर सुपर इंपोज केले असता सदरचे क्षेत्र हे अधिसूचीत राखीव कांदळवन नसल्याचे दिसून येत आहे. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. (अहवाल अप्राप्त) |
| ६ | **तक्रार क्र. ९५** दि.१२.०९.२०१९ श्री. रेजी अब्राहम Request strong action against concerned officials (Revenue, BMC (P north SWM department), malwani police station and mangroves cell) for overlooking timely action in spite of first complaint on 01.02.2018(mcc2017-43) and last complaint on 09.09.2019. | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. (अहवाल अप्राप्त) |
| ७ | **तक्रार क्र. ९८ श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार दि.०६.०८.२०१९** Debris mafia shifts goalposts on Sion Panvel Highway – Chembur. | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी सदरची जागा ही सॉल्ट विभागाची असून सॉल्ट आयुक्तांना कांदळवन ऱ्हासाबाबत कळविले असल्याचे सांगितले.<br>• परंतु समितीने सदरची जागा सॉल्ट विभागाची असली तरी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्यामार्फत सदर जागेची स्थळ पाहणी करुन डेब्रिज हटविण्याकरीता योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. (अहवाल अप्राप्त) |
| ८ | **तक्रार क्र. १११** दि.23.12.2019 श्री. सुकांत कॉल Mangrove Destruction जनकल्याण नगर, मालाड (पश्चिम) मुंबई. | • या तक्रारी संदर्भात वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांच्या अहवालानुसार मंडळ अधिकारी गोरेगाव, तलाठी गोरेगाव नगर भुमापन अधिकारी गोरेगाव कार्यालयातील परिरक्षण भूमापक क्र. ६, महानगरपालिका यांचे प्रतिनिधी यांच्या समवेत स्थळ पाहणी केली असता स.क्र. २८,३ न.भु.क्र. ७४५ मरीना इनक्लेव्ह इमारतीच्या पाठीमागे जागेवर अंदाजे ८ ते १० महिन्यापूर्वी डेब्रिजची भरणी केल्याचे व कांदळवनाची तोड झाल्याचे दिसून आले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. (अहवाल अप्राप्त) |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | **तक्रार क्र. ११२** श्री. संय्यद अब्बास रिझवी **दि.** 25.12.2019 - Complaint against blatant destruction of Mangroves by dumping debris and for carryingout unauthorized and illegal construction of RCC building on mangroves land in CRZ 1 department of P/North Ward, Malad West, Mumbai. | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. (अहवाल अप्राप्त) |
| १० | **तक्रार क्र. ११८ श्री. हरीश पांडे दि.25.01.2020** large scale CRZ 1 reclamation & mangroves destruction in Ganpat Patil Nagar in Dahisar, Mumbai | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. (अहवाल अप्राप्त) |
| ११ | **तक्रार क्र. ११९ श्री. हरीश पांडे दि.25.01.2020** Reclamation of wetlands at Dharma Nagar, Borivali West. | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. (अहवाल अप्राप्त) |
| १२ | **तक्रार क्र. १२० श्री. हरीश पांडे दि.25.01.2020** Mass scale reclamation of Wetlands & Mangroves next to Eskay Club, Borival | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. (अहवाल अप्राप्त) |
| १३ | **तक्रार क्र. १२१** श्री. रेजी अब्राहम दि.24.01.2020 Illegal constructions in charkop village by chawl mafia Bipin Bhandari and Chaurasiya on collector land... | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर (अहवाल अप्राप्त) |
| १४ | **तक्रार क्र. १२२** श्री. रेजी अब्राहम दि.4.03.2020 Large scale Illegal construction activities continue unabated on huge tracts of land under ND zone affected by CRZ laws at acres of collector | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर (अहवाल अप्राप्त) |

| | | | |
|---|---|---|---|
| | land/forest land at CTS no.1650 and adjacent huge layout of village erangal, opposite retreat hotel, bhask... | | |
| १५ | **तक्रार क्र. १३७ स्वाभिमानी पॅन्थर संघटना दि.१८.१०.२०२०** जाणीवपूर्वकबृहन्मुंबईमहानगर पालिकेच्यानाल्यातकचराटाकून , संरक्षित कांदळवनाच्या ऱ्हासास कारणीभूत असलेल्या DOGUS SOMA JV, या कंपनीवर भारतीय दंड संहिता व इतर कायद्यानुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दयावेत. | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी मुंबईउपनगर बी.एम.सी (अहवाल अप्राप्त) |
| १६ | **तक्रार क्र. १३८ श्रीमती श्वेता भट दि.२६.१०.२०२०** Destruction of mangroves near sea breeze building, near Shiniya Mahadev temple, Versova, Andheri West, Mumbai. | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर **(अहवाल अप्राप्त)** |
| १७ | **तक्रार क्र. १३९ श्री. स्टॅलिन डी. दि.२७.१०.२०२०** Reclamation and illegal construction at Azad Mohalla | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर **(अहवाल अप्राप्त** |
| १८ | **तक्रार क्र. १४० श्री. प्रसाद खाले दि.२७.१०.२०२०** Destruction of mangroves at Mankhurd | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर **(अहवाल अप्राप्त)** |
| १९ | **तक्रार क्र. १४१ श्री. रोहीत जोशी** Destruction of Mangrove in Bhandup | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| २० | **तक्रार क्र. १४२ श्री. स्टॅलिन डी. दि.०३.०२.२०२१** Extensive ongoing destruction of mangroves, wetlands and CRZ areas in Mahul. | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |

**ठाणे जिल्हयातील कांदळवन तक्रारी**

| अ. क्र. | तक्रार क्र. व तक्रारीचा विषय | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारीयंत्रणा |
|---|---|---|---|
| २१ | **तक्रार क्र. ९** श्री. जयेश गुप्ता – दि.२४.११.२०१८ Destroying mangroves in the CRZ Creek ara of Sabe- Desai-Khardi Gaon, Thane. | • समितीने या तक्रारीबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत (MPCB) स्थळ पाहणी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना समितीने दिल्या. | आयुक्त ठाणे महानगरपालिका |
| २२ | **तक्रार क्र. १७** श्री. धिरज परब, दि.०५.१२.२०१८ सेव्हन इलेव्हन हॉटेल कं. ने मीरा रोड कनकिया येथे कांदळवनाची तोड करुन माती भराव व कुंपण भिंत बांधकाम केल्याबाबत. | • या तक्रारीबाबत आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या दि. २०.०३.२०२० रोजीच्या अहवालानुसार मौजे नवघर सर्वे क्र. ५०, ५१,५८,६९ ही जागा सेव्हन इलेव्हन हॉटेल कंपनीच्या मालकीची आहे.<br>• तसेच सर्वे क्र. ५० येथे पत्र्याचे संरक्षण भिंत आढळून आली आहे.<br>• सर्वे क्र. ५१ येथे सपाटीकरण करुन काही ठिकाणी गार्डन तयार करण्यात आलेले आहे.<br>• तसेच सर्वे क्र. ५९ येथे सपाटीकरण करण्यात आलेले आहे.<br>• सर्वे क्र. ६९ येथे सिमेंट कॉक्रीटचा छोटा रस्ता तयार करण्यात आला आहे.<br>• सेव्हन इलेवन हॉटेल प्रा. लि. चे श्री. विनोद मेहेता यांच्या विरुध्द सदर ठिकाणी कांदळवनाचे नुकसान केल्याप्रकरणी गुन्हा क्र. १११२/२०१० दाखल करण्यात आला आहे. तसेच सर्वे क्र. ६९हि क्र. १,२या ठिकाणी काही भागात सपाटीकरणाचे काम चालू असल्याचे व सदरचे काम कांदळवनालगत सी.आर. झेड लगत होत असल्याचे निदर्शनास आले म्हणून श्री. प्रशांत केळुसकर, विनोद मेहेता व इतर जमीन मालक यांच्या विरुध्द गुन्हा क्र. ०१८९ अन्वये गुन्हा दाखल झाल्याचे दिसून येत आहे. सदर विकास कामाबाबत महानगरपालिकेमार्फत गुन्हा दाखल करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. | जिल्हाधिकारी, ठाणे (अहवाल अप्राप्त) |
| २३ | **तक्रार क्र. २१** श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार दि.०९.१२.२०१८ Sion Panvel Highway work damaging Mangroves. | • तहसिलदार ठाणे यांच्या अहवालानुसार Highway जवळ कांदळवनाचे नुकसान झालेले नाही परंतु सदर जागेवर कांदळवनालगत डेब्रिज टाकण्यात आलेले आहे.<br>• सदरचे कांदळवन हे सायन पनवेल रोडपासून १० ते १५ मी. अंतरावर असून पनवेल रोडच्या रुंदीकरणाच्या कामामुळे आजरोजी कोठेही नुसान झाल्याचे दिसून येत नाही.<br>• तसेच सदरची कार्यवाही पुर्ण करण्यासाठी कार्यकारी अभियंता, PWD यांना बैठकीत उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आहे परंतु सदरची कार्यवाही अद्याप प्रलंबित आहे. | जिल्हाधिकारी, ठाणे (अहवाल अप्राप्त) |
| २४ | **तक्रार क्र. ८३** श्री.बी.एन. कुमार ०१.०८.२०१८ Mangrove killing along Sion-Panvel highway - | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | Request for rapid action force. | | |
| २५ | **तक्रार क्र. ६५**<br>श्री. सुबीर वर्मा -<br>दि.२७.०३.२०१९<br>Dumping to claim mangrove Land, Thane. | • तहसिलदार ठाणे यांच्या दि.०५.११.२०१९ रोजीच्या अहवालानुसार मंडळ अधिकारी बाळकुम यांनी अर्जदार यांचे समवेत दि. २९.६.२०१९ रोजी प्रत्यक्ष जागेवर जाउुन पाहणी केली असता सदर जमिनीवर मोठया प्रमाणात डेब्रिजचा भरणा केलेला असून जमीन भरणी करत पुढे पुढे वाढवत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.<br>• **समितीने या तक्रारीबाबत Satellite Image समितीकडे सादर करण्यास व त्यानुसार उचित कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी ठाणे यांना दिले.** | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. मीरा-भाईंदर महानगरपालिका, जि. ठाणे.<br>(अहवाल प्राप्त) |
| २६ | **तक्रार क्र. ७६**<br>श्री. धिरज परब:-भाईंदर पश्चिम राधा स्वामी सत्संग व परिसरात पाणथळ, कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत.<br>पाणथळ समितीकडून कांदळवन समितीकडे वर्ग केलेली तक्रार | • समितीने सदर ठिकाणी संबंधीतांवर FIR दाखल करुन मिरा-भाईंदर महानगरपालिके मार्फत तेथील डेब्रिज व माती भराव काढण्याचे निर्देश देऊन अहलवा समितीपुढे सादर करण्यास सांगितले. | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. आयुक्त, मीरा-भाईंदर मनपा,<br>(अहवाल अप्राप्त) |
| २७ | **तक्रार क्र. ७७** श्री. धिरज परब:- मीरा भाईंदर महापालिका हद्दीतील मीरा रोड पश्चिम येथे नाझरेथ आगर परिसरात सरकारी व खाजगी जागेत कांदळवन पाणथळचा ऱ्हास करून CRZ चेउल्लंघन. | • समितीने मिरा-भाईंदर महानगरपालिके मार्फत सदर ठिकाणी असलेला असलेला भराव हटविण्याच्या व सदर ठिकाणी पुन्हा भराव होणार नाही याची दक्षता घेण्यास सांगितले. | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. आयुक्त, मीरा-भाईंदर मनपा,<br>(अहवाल अप्राप्त) |
| २८ | **तक्रार क्र. ७९** श्री. धिरज परब: - मीरा भाईंदर महापालिका हद्दीतील नवघर गाव मागील सरकारी खाजण सर्वे क्र. १५मध्ये मनपाने पाणथळ, कांदळवन व सीआरझेड १ मध्ये बेकायदा टाकलेला कचरा, भराव काढून कांदळवनाची लागवड.<br>पाणथळ समितीकडून वर्ग | • समितीने मिरा-भाईंदर महानगरपालिके मार्फत सदर ठिकाणी बांधलेले अनधिकृत शौचालय तोडण्याबाबत कार्यावाही करण्याच्या सूचना दिल्या. | तहसिलदार ठाणे<br>(अहवाल अप्राप्त) |
| २९ | **तक्रार क्र. ८२** श्री. प्रसाद खाले ११.०६.२०१९<br>Destruction of Mangroves by dumping of debris and reclamation at Kharegaon, Kalwa | • सदर ठिकाणी आज रोजी कांदळवनाची तोड झालेली नाही. परंतु कांदळवनापासून ५० मी च्या आत अनधिकृत बांधकाम भंगारची दुकाने सुरु केल्याचे निदर्शनास आले.<br>• त्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिका यांच्या यंत्रणेमार्फत निष्कासनाची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी ठाणे आणि ठाणे महानगरपालिका<br>(अहवाल अप्राप्त) |

| | | | |
|---|---|---|---|
| ३० | **तक्रार क्र. ८९** श्री. जतीन दधीच दि. ०४.०८.२०१९ Destruction of mangroves, illegal land filling and construction of Chawl (10 rooms) at Government Land, Shivneri, Village Rai, Bhayander West, by Land/ Chawl Mafia Pravin Tiwari and Meghnath Patil. | • तसेच अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांच्या अहवालानुसार सदर ठिकाणी चाळ स्वरुपाचे पत्र्याचे बांधकाम असून एकूण १० खोल्यांपैकी काही खोल्यांचे बांधकाम महानगरपालिका दि.२४.०१.२०२० रोजी निष्कासीत करण्यात आलेले आहे.<br>• **त्या अनुषंगाने समितीने सदरची तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले.** | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. आयुक्त, मीरा-भाईंदर मनपा, जि. ठाणे.<br>अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांचा अहवाल प्राप्त |
| ३१ | **तक्रार क्र. ९०** श्री. के.एस. शुल्का - दि. १३.०८.२०१९ Debris and Garbage dumping in the Creek and on the Mangroves in Sector-11, Belapur | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. आयुक्त, मीरा-भाईंदर मनपा, जि. ठाणे.<br>(अहवाल अप्राप्त) |
| ३२ | **तक्रार क्र. ९७ श्री. आरीफ इराकी दि.०९.०८.२०१९** Complaint against the Collector of thane for causing Contempt of Court for their no action against illegall sand mining and thereby abetting to the destruction of mangroves and environment at Mumbra Creek (Along Ulhas River) At Retibunder and Desai Khadi near Chuha Pal in Diva, Thane. | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी ठाणे (अहवाल अप्राप्त) |
| ३३ | **तक्रार क्र. १००** श्री. धिरज परब -दि.14.10.2019 भाईंदर पश्चिम येथे बजरंग नगर भागात महापालिकेने कांदळवन क्षेत्रात बेकायदेशीर भराव करून कॉंक्रीट टाकी, स्लॅब टाकून शौचालयाचे बांधकाम केल्या प्रकरणी. | • या तक्रारीबाबत अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांच्या अहवालानुसार सदरचे काम करताना आजरोजी कांदळवनाचे नुकसान झालेले दिसून येत नाही. तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना प्रत्यक्ष स्थळ पाहणी व अर्जदार यांचे मागणीनुसार नमुद ठिकाणी प्रस्तुत बांधकाम पुर्णपणे तोडणेबाबत कारवाई तात्काळ करणेबाबत कळविले आहे.<br>• **त्या अनुषंगाने समितीने मिरा-भाईंदर महानगरपालिकेला सदरील बेकायदेशीर बांधकाम तात्काळ हटविण्याचे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीकडे पुढील बैठकीपूर्वी सदर करण्याचे निर्देश दिले.** | जिल्हाधिकारी, ठाणे.<br>अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांचा (अहवाल प्राप्त) |
| ३४ | **तक्रार क्र. १०४** श्री. धिरज परब दि.19.11.2019 | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. आयुक्त, मीरा- |

| | | | |
|---|---|---|---|
| | भाईंदर पश्चिम येथे एसटी डेपोच्या आरक्षणातील कांदळवन नष्ट करून झाडे तोडणे तसेच बेकायदा डेब्रिस चा भराव व थर्माकोल आदींचा कचरा टाकून पर्यावरणाचा ऱ्हास प्रकरणी | | भाईंदर हानगरपालिका (अहवाल अप्राप्त) |
| ३५ | **तक्रार क्र. १०५** श्री. धिरज परब दि. 05.03.2019 चौक जेट्टी जवळ बालेपीर शाह दर्गा लगत कांदळवन व सरकारी जागेत पर्यावरणाचा ऱ्हास. | • या तक्रारी संदर्भात अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांनी केलेल्या दि.०३.०१.२०२० रोजी केलेल्या स्थळ पाहणीनुसार स्थळ पाहणी दरम्यान चौक जेट्टी बालेपीर शाह दर्गा येथे पाहणी केली असता सदर दर्गा मौजे चौक येथील सर्वे नं. ७ या सरकारी जमिनीवर अंदाजे १०० वर्षापासून असून आज रोजी दर्गाचे नव्याने नुतणीकरणाचे काम सुरु आहे. सदर दर्गा कांदळवन पासून ५० मीटरच्या आत आहे. तसेच आज रोजी सदर ठिकाणी कांदळवनाची तोड झालेली दिसून येत नाही.<br>• त्या अनुषंगाने या तक्रारीबाबत समितीच्या अध्यक्षांच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. | १. जिल्हाधिकारी, ठाणे. अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांचा (अहवाल प्राप्त)<br>२. आयुक्त, मीरा-भाईंदर महानगरपालिका |
| ३६ | **तक्रार क्र. १०९ श्री. रोहीत जोशी दि.०८.१२.०१९** कोलशेत येथे खाडीकिनारी कांदळवनाशेजारी बेकायदेशीर रित्या कॉंक्रीटचे बांधकाम केल्याबद्दल ठामपा वर कारवाई करणेबाबत | • समितीने सदर जागेची उपसमितमार्फत स्थळ पाहणी करण्यास व संबंधीत कामासाठी परवानग्या प्राप्त असलेली कागदपत्रे समितीकडे सादर करण्याच्या सूचना ठाणे महानगरपालिकेला दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे आणि ठाणे महानगरपालिका (अहवाल अप्राप्त) |
| ३७ | **तक्रार क्र. ११६** श्री. सुनील अगरवाल दि. 04.12.2020 Mangrove and wetlands destruction near Hiranandani Estate Thane. | • समितीने या तक्रारीबाबत जिल्हास्तरीय समितीमार्फत स्थळ अहवाल, पंचनामा व जागेच्या छायाचित्रासहिती अहवाल समितीकडे सादर करण्याच्या सूचना समितीने दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे ठाणे महानगरपालिका (अहवाल अप्राप्त) |
| ३८ | **तक्रार क्र. ११७**, श्री. संतोश डॅनिअल, दि. 15.01.2020 Encroachment on Mangroves Land in Sect-12 Ghansoli. | • समितीने या तक्रारीबाबत जिल्हास्तरीय समितीमार्फत स्थळ अहवाल, पंचनामा व जागेच्या छायाचित्रासहिती अहवाल समितीकडे सादर करण्याच्या सूचना समितीने दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे व सिडको (अहवाल अप्राप्त) |
| ३९ | **तक्रार क्र. १२४ श्री. अजीत पाटील दि.27.02.2020** मौजे कोपरी ता. जि. ठाणे या खाजण जमिनीवर कांदळवनाची कत्तल करुन ठाणे महापालिका भरणी करत असलेबाबत. | • या तक्रारीबाबत ठाणे महानगरपालिका यांच्या अहवालानुसार सदर कामाचे ठिकाणी करण्यात आलेला भराव हा कंत्राटदारामार्फत करण्यात आला नसून, स्मार्ट सिटी अंतर्गत सुरु असलेल्या गावदेवी येथील वाहनतळाच्या खोदकामातून प्राप्त झालेल्या उत्खलनातील मुरुमचा भराव ठाणे स्मार्ट सिटी लि. मार्फत करण्यात आला आहे. | जिल्हाधिकारी ठाणे ठाणे महानगरपालिका जि. ठाणे. (अहवाल प्राप्त) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • **समितीने या तक्रारीबाबत संबंधीतांवर गुन्हे दाखल करुन FIRची प्रत समितीकडे सादर करण्याच्या व सदर जागेचे Restoration करण्याचे निर्देश दिले.** | |
| ४० | **तक्रार क्र. १२५** श्री. शिवम श्रीवास्तव दि.१५.०६.२०२० MANGROVES DESTRUCTION in Village Mhatardi, Diva, Thane | • वन विभागामार्फत केलेली कार्यवाही: - वनपरिक्षेत्र अधिकरी भिवंडी यांचे दि.१०.०८.२०२० रोजीच्या अहवालानुसार ॲव्हीसिनिया मरिना या प्रजातीचे कांदळवन झाडांची तोड जवळपास २ ते ३ महिन्यापूर्वी मुळासकट तोडलेली दिसून आली.<br>• **समितीच्या अनुषंगाने सदर ठिकाणी जिल्हाधिकारी ठाणे यांच्यामार्फत उचित कार्यवाही करुन संबंधीतांवर गुन्हा दाखल करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या.** | जिल्हाधिकारी ठाणे, महानगरपालिका जि. ठाणे. (अहवाल प्राप्त) |
| ४१ | **तक्रार क्र. १२६** श्री. धिरज परब दि.२३.०६.२०२० भाईंदरच्या उत्तन येथील पाली ते करई पाडा - उत्तान नाका दरम्यानच्या सरकारी जागेतील नवीखाडी पात्र व परिसरातील कांदळवनाची मोठ्या प्रमाणात तोड करून भराव, कचरा टाकणे व बांधकामे केल्या प्रकरणी | • या तक्रारी संदर्भात अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांनी केलेल्या दि.१४.१०.२०२० रोजी च्या स्थळ पाहणीनुसार अहवालानुसार मौजे उत्तन जि. ठाणे येथील जमीन सर्वे नं. २९४ ए १ मध्ये अंदाजे ३० ते ४० वर्षापासूनचे बांधकाम दिसून येते. सदर बाधकामामुळे पाणी बदं झाल्यामुळे खाडीतील कांदळवनाची झाडे सूकलेली आढळून आली आहेत. तसेच सदर ठिकाणी नवीन कांदळवनाचे तोड दिसून आलेली नाही.<br>• **त्या अनुषंगाने समितीने सदरची तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले.** | जिल्हाधिकारी ठाणे आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका जि. ठाणे. (अहवाल प्राप्त) |
| ४२ | **तक्रार क्र. १३०** श्री. प्रसाद खाले Destruction of Mangroves near Sandstone Building, Unique Gardens, Mira Road. | • या तक्रारीबाबत अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांच्यादि. २९.१० २०२० रोजीच्या अहवालानुसार सदर जमीनीवर मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी गार्डन छाटनी केलेली झाडे विखुरलेल्या स्वरुपात टाकण्यात आली असून २ ते ३ गाडया डेब्रिज अंदाजे १ वर्षापूवी टाकण्यात आले असल्याची माहिती जागेवर उपस्थित असलेल्या उद्यान अधिक्षक, श्री. हंसराज मेश्राम व उपआयुक्त मुख्यालय श्री. अजीत मुठे यांनी दिली. सदर ठिकाणी कांदळवनास कोणत्याही प्रकारे नुकसान झालेले नाही. तसेच सदर ठिकाणी असलेले डेब्रिज मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून हटविण्याची कार्यवाही तात्काळ करणेबाबत कळविले आहे.<br>• **त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत उपसमितीमार्फत झालेल्या दि. ८ फेब्रुवारी २०१९ चा स्थळ पाहणी अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या.** | जिल्हाधिकारी ठाणे जि. ठाणे. मिरा-भाईंदर महानगरपालिका (अहवाल प्राप्त) |
| ४३ | **तक्रार क्र. १३३ श्री. आदर्श कुमार दि.१२.०८.२०२०** Destruction of Mangroves and Dumping of solid waste and encroachments at Balkum, Thane | • सदर ठिकाणी कांदळवन नाही परंतु अंदाजे १५ ते २० मीटर अंतराव कांदळवन प्रजाती निदर्शनास आल्या आहेत. लॅटीटयुड 19 14 24 व लॉन्जीटयूड एन 72 59 49 ई येथे रोड लगत कंपाऊंड करुन तेथे पत्रयाचे शेड बांधले आहे. त्याच्या जवळ कांदळवन प्रजाती दिसून आले आहेत. | जिल्हाधिकारी ठाणे ठाणे महानगरपालिका जि. ठाणे. (अहवाल अप्राप्त) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सदरची जागा ही महसूल विभागाच्या ताब्यात आहे व तेथे अतिक्रमण होत असल्याचे निदर्शनास आले आहे.<br>• त्या अनुषंगाने सदर ठिकाणी होत असलेले अनधिकृत बांधकाम निष्कासन करण्याचे जिल्हाधिकारी ठाणे यांना निर्देश दिले आहेत. | |
| ४४ | **तक्रार क्र. ३०** श्री. विनोद पुन्शी- दि.१७.१२.२०१८ Effluents released in mangroves raise a stink- T.O. I. Navi Mumbai Report dated 16.12.2018 | • समितीने या तक्रारीबाबत MPCB च्या नोडल अधिकाऱ्यांसोबत स्थळ पाहणी करण्यास सांगितले व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना मागील बैठकीत दिल्या होत्या.<br>• परंतु MPCB मार्फत कोणीही प्रतिनिधी उपलब्ध नसल्याने तक्रार अद्याप प्रलंबित आहे. | जिल्हाधिकारी ठाणे (अहवाल अप्राप्त) |
| ४५ | **तक्रार क्र. ५६** श्री. सुनिल अगरवाल –दि.12.02.2019 Systematic Destruction of Mangroves in Nerul Seawoods behind TSC maritime institute. | • या तक्रारीबाबत सिडको यांच्या अधिकाऱ्यांनी तक्रारदारासोबत दि.०७.०९.२०१९ रोजी स्थळ पाहणी करण्यात आली असून सदर ठिकाणी कांदळवनाजवळ डेब्रिज टाकण्यात आले आहे. सिडको कंपाऊंडच्या बाजूला असलेले डेब्रिज काढण्यात आले आहे.<br>• **त्या अनुषंगाने सदरची तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले.** | जिल्हाधिकारी ठाणे सिडको (अहवाल प्राप्त) |
| ४६ | **तक्रार क्र. ८६ श्री. विनोद पुन्शीदि ०९.०५.२०१९** Wetland being filled up overnight Near Indian Institute of Geo magnetism campus. पाणथळ समितीमधील तक्रार | • या तक्रारी संदर्भात सिडको यांच्या प्रतिनिधींनी सदर जागेवर स्थळ पाहणी झाली असून सदर ठिकाणी असलेला भराव हा काढण्याची प्रक्रिया सुरु आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारी बाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | सिडको (अहवाल अप्राप्त) |
| ४७ | **तक्रार क्र. १२७** श्रीम. श्वेता भट दि.०२.०६.२०२० Destruction of mangroves west of Satyam Imperial Heights, Ghansoli - Sector ११, Navi Mumbai. | • वन परिक्षेत्र अधिकारी नवी मुंबई यांचे दि. 03.06.2020 रोजीच्या अहवालानुसार सदर ठिकाणी नवी मुंबई महानगरपालिकेची Sport Complex करिता राखीव जागा आहे. सदर जागा ही सिडको च्या मालकीची असून सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारे कांदळवनाचा ऱ्हास झालेला नाही.<br>• **त्या अनुषंगाने सदरची तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले.** | सिडको आणि आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका (अहवाल प्राप्त) |
| ४८ | **तक्रार क्र. १३५ श्री. ऐरेंडोम बॅनर्जी दि.१४.१०.२०२०** Destruction of mangroves at Hiranandani estate Thane | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी ठाणे |
| ४९ | **तक्रार क्र. १४३ श्री. स्टॅलिन डी. दि.०८.०२.२०२१** Mangroves destroyed and road made, tide water blocked At Taloja phata | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ५० | **तक्रार क्र. १४४ श्री. निलेश दि. १०.०२.२०२१ कळवा पुलाखालील खाडीतील अतिक्रमण आणि कांदळवन झाडांची कत्तल** | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी ठाणे |

**रायगड जिल्हयातील कांदळवन तक्रारी**

| **तक्रार क्र.** | **तक्रार** | **करावयाचीकार्यवाही** | **अंमलबजावणी करणारीयंत्रणा** |
|---|---|---|---|
| ५१ | तक्रार क्र. ३७ श्री. नंदकुमार पवार- दि.१९.०६.२०१८<br>2) Coastal road - There are huge patches of mangroves have found dead either side of the coastal road by blocking of tidal water flow. | • जिल्हाधिकारी रायगड यांच्या अहवालानुसार सदर कामी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकारणाने राष्ट्रीय महामार्ग 4 ब लगत नवघर, चाणजे, द्रोणागिरी नोड ते करंजापर्यत महामार्ग तयार करताना नष्ट होणाऱ्या कांदळवनाबाबत आवश्यक असणाऱ्या केंद्र सरकार, पर्यावरण खाते यांचेकडून दि. 3 फेब्रुवारी, 2009 रोजी पर्यावरण दाखला घेतला आहे. MRSAC कडील नकाशानुसार सदर ठिकाणी कांदळवनाची तोड झाल्याचे आढळून येत नाही.<br>• त्या अनुषंगाने सदर प्रकरणी कांदळवनाची तोड अथवा ऱ्हास न झाल्याने तक्रार निकाली ठेवणेस हरकत नाही असे नमूद केले आहे. | जिल्हाधिकारी रायगड |
| ५२ | तक्रार क्र. ८८ श्री. नंदकुमार पवार.दि. ३०.०७.२०१९<br>Chopping of mangroves stretch at pagote, Uran | • सदर बाबतीत दि.22.11.2019 रोजी मंडळ अधिकारी उरण यांनी सविस्तर पंचनामा केला असून तेथील परिस्थितीवरुन NMSEZ च्या पदाधिकाऱ्यांनी तेथील कांदळवन तोडून पर्यावरणाची हान केल्याचे निदर्शनास आल्याने त्यांच्या विरुध्द FIR No. ०२८९/२०१९ दि. 19.12. 2019 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.<br>• त्या अनुषंगाने सदर ठिकाणी Replantation ची संख्या ही 4444 असल्याने 3 एकर करिता एकूण 5333 कांदळवनाची झाडांची लागवड करण्याच्या NMSEZ यांना सूचना दिल्या आहेत.<br>• सरपंच ग्रामपंचायत यांच्या अहवालानुसार श्री. निलेश पाटील, व श्री. प्रदिप पाटील यांचे विरुध्द पागोटे येथील भराव केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याबाबत मागणी करण्यात आली आहे. | जिल्हाधिकारी, रायगड |
| ५३ | **तक्रार क्र. ९२** श्री. नंदकुमार पवार.<br>दि. ३०.०७.२०१९ उरण तालुक्यामध्ये विकास व पायाभूत सुविधांच्या नावाने होणाऱ्या खाजण जमीनी व न भरुन येणाऱ्या पर्यावणाच्या ऱ्हासासंबंधी आपले लक्ष वेधणेबाबत. | • समितीने या तक्रारीबाबत तक्रारदारासोबत स्थळ पाहणी करुन केलेल्या कार्यवहीचा संपुर्ण अहवाल समितीकडे सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी रायगड यांना दिले. | जिल्हाधिकारी, रायगड<br>(अहवाल अप्राप्त) |

| | | | |
|---|---|---|---|
| ५४ | **तक्रार क्र. ९३** श्री. नंदकुमार पवार.<br>दि. २८.०८.२०१९Municipal solid waste dumping on Mangroves | • जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्राप्त अहवालानुसार उरण तालुक्यातील हनुमान कोळीवाडा येथे दि.22.11.2019 रोजी परिक्षेत्र वन अधिकारी उरण, मंडळ अधिकारी उरण, तलाठी सजा उरण, तसेच तक्रारदार श्री. नंदकुमार पवार यांच्या समवेत संयुक्त स्थळ पाहणी करण्यात आली असून सदर ठिकाणी कांदळवनाचा नाश झाल्याचे आढळून आलेले नाही.<br>• तसेच जिल्हाधिकारी रायगड यांनी सदरची जागा कांदळवना लगत असल्यामुळे कांदळवनाचा नाश होऊ शकतो. त्यामुळे जिल्हाधिकारी रायगड यांनी उरण Dumping Ground साठी वेगळी पर्यायी जागा म्हणून सिडको क्षेत्रातील जागेची निवड करण्याबाबत सिडकोच्या संबंधीत अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे. | १. जिल्हाधिकारी, रायगड<br>२. सिडको, नवी मुंबई. |
| ५५ | **तक्रार क्र. ९९ श्री. विनोद पुन्शी .२०.०९.२०१९**<br>T.O.I. Navi Mumbai report on 20/09/2019 regarding mangroves destruction off S-P adjacent to Roadpali road. | • जिल्हाधिकारी रायगड यांनी केलेल्या स्थळ पाहणी अहवालासोबत पंचनामा व इतर कागदपत्रे जोडलेली नाही त्यामुळे समितीने या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा संपुर्ण स्थळ पहाणी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी रायगड<br>(अहवाल अप्राप्त) |
| ५६ | **तक्रार क्र. १०१** श्री. दिपेश म्हात्रे दि. 06.11.2019<br>DUMPING OF CITY WASTE ON MANGROVE. | • जिल्हाधिकारी रायगड यांच्या दि. 25.08.2019 रोजीच्या प्राप्त अहवालानुसार उरण तालुक्यातील मोरा रोड बोरीपाखाडी येथील कांदळवनाचा ऱ्हास होत असल्याबाबत तक्रारीच्या अनुषंगाने परिक्षेत्र वन अधिकारी उरण, मंडळ अधिकारी उरण, तलाठी सजा उरण तसेच श्री. बी.एन. कुमार व मोरा येथील रहिवासी यांचे समवेत संयुक्त स्थळपाहणी करण्यात आली असून उपविभागीय अधिकारी पनवेल यांचे अहवालानुसार आजमितीस नमूद ठिकाणी कांदळवनाचा नाश झाल्याचे आढळून आलेले नाही. | जिल्हाधिकारी, रायगड<br>(अहवाल प्राप्त) |
| ५७ | **तक्रार क्र. १०२** बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार दि.07.11.2019 Uran mangrove zone turns into massive garbage dumping ground | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी, रायगड<br>(अहवाल अप्राप्त) |
| ५८ | **तक्रार क्र. ११४** श्रीमती कस्तुरी गांधी<br>दि. 26.12.2019<br>Destruction of Mangroves at NMSEZ at Panje Wetlands, Uran. | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी रायगड यांच्या दि. 02.01.2020 रोजीच्या अहवालानुसार सदरची जागा ही सिडको यांच्या मालकीची असून त्यांच्याद्वारे NMSEZ यांना देण्यात आली आहे तसेच मौजे पाणजे येथील जागा ही पाणथळात मोडत नसल्याचे दिसून येते. सदर ठिकाणी आज रोजी पाणी व चिखल स्वरुपात जमिनीवर गाळ पसरलेला आहे. सदरचे पाणी लहान सिमेंटचे चॅनलद्वारे एका बाजूने वाहत असल्याचे दिसून येत आहे. तसेच | जिल्हाधिकारी, रायगड<br>(अहवाल प्राप्त) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | याप्रकरणी उरण पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र. 286 दि.16.12.2019 रोजी दाखल करणेत आलेला आहे.<br>• **त्या अनुषंगाने समितीने सदरची तक्रार बंद करण्याचे व Restoration करण्याचे निर्देश दिले.** | |
| ५९ | **तक्रार क्र. १२३ श्री. विवेक कडु** दि.02.02.2020 Mangrove destruction near Chirle, Uran | • जिल्हाधिकारी रायगड यांच्या दि. 07.10.2020 रोजीच्या अहवालानुसार सदर ठिकणी रस्ता रुंदी करणाचे काम चालू असून भरावामध्ये कोणत्याही प्रकारचे कांदळवन गाडले गेले नाही. प्रत्यक्ष स्थळ पाहणी वेळी सदर ठिकाणाचे कांदळवन सुस्थितीत असल्याचे दिसून येते.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत स्थळ पाहणी अहवाला सोबत, पंचनामा, जागचे छायाचित्रे समितीकडे सादर करण्याचे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, रायगड (अहवाल अप्राप्त) |
| ६० | **तक्रार क्र. १३६ श्री. प्रसाद खाले दि.१६.१०.२०२०** Destruction of Mangroves at Bhagat Aali, Awas, Alibaug | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, रायगड (अहवाल अप्राप्त) |
| ६१ | **तक्रार क्र. १४५ श्रीम. सिमा टंक दि.०५.०३.२०२१** Need immediate action against this harmful chemical powder dump in CRZ-१ wetlands area of sector 16 Kharghar. | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, रायगड (अहवाल अप्राप्त) |
| ६२ | **तक्रार क्र. १४६ श्रीम. विमल किर्ती** दि.२८.१२.२०२० Mangrove destruction near lingeshwar mandir, ulwe, navi mumbai (४१०२०६). | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, रायगड (अहवाल अप्राप्त) |

पालघर जिल्हयातील कांदळवन तक्रारी

| अ.क्र | तक्रार | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| ६३ | **तक्रार क्र. ६७ श्री. वैभव - दि. २९.०३.२०१९** तलाठी सजा मौजे जूचंद्र तालुका - वसई जि. पालघर येथील सर्व्हे ८५ हिस्सा नं. ५ बी | • निवासी उपजिल्हाधिकारी पलघर यांच्या दि. 09.11.2020 रोजीच्या अहवालानुसार सदर डेब्रिजच्या भरावाखाली कांदळवनाची झाडे गाडली गेल्याचे निदर्शनास आल्याने प्रकरणी श्रीम. मिनल गोविंदराव पाटील व इतर 8 यांच्यावर पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 चे कलम 15 व 17 अन्वये पोलीस स्टेशन वालीव येथे दि. 24.10.2020 रोजी गुन्हा नं. 0876/2020 अन्वये दाखल करण्यात आलेला आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदरची तक्रार बंद करण्याचे व Restoration करण्याचे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी पालघर (अहवाल प्राप्त) |
| ६४ | **तक्रार क्र. ८५** श्री. दिनार कृष्णा म्हात्रे- दि. ११.०७.२०१९कांदळवनाची बेसूमार तोड करुन | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | पर्यावरणाचा ऱ्हास केल्याबाबत. | | |
| ६५ | **तक्रार क्र. १२८ समर्थन लाईव्ह दि.१७.०७.२०२०** डहाणू तालुक्यातील वडकून येथे कांदळवन क्षेत्रात कोळंबी प्रकल्प चालू असलेबाबत. | • निवासी उपजिल्हाधिकारी पलघर यांच्या दि. 09.11.2020 रोजीच्या अहवालानुसार सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी डहाणू यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून सदर ठिकाणी ग.न. 234/1 क्षेत्र 352.86हे. आर. या जमीनीच्या कब्जेदार सदरी बिन आकारी पडीत अशी नोंद आहे. सदर जमीनमध्ये सन 2002 पासून एकूण 10 कोळंबी भाडेपट्टाधरकांना कोळंबी व मिठागरे प्रयोजनार्थ परवानगी देण्यात आलेली आहे.<br>• **त्या अनुषंगाने समितीने सदरची तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले.** | जिल्हाधिकारी पालघर (अहवाल प्राप्त) |
| ६६ | **तक्रार क्र. १२९ श्री. मर्सेलीन कोरीया दि.२९.०७.२०२०** मौजे टेंभी भुमापन क्र. 117 हि. क्र. ०१ शासकीय जमिनवीर कांदळवन कत्तल / पाणथळ क्षेत्राचा नाश | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी पालघर यांच्या दि.21.10.2020 रोजीच्या अहवालानुसार सदर तक्रारीबाबत उपविभागीय अधिकारी, वसई यांचेमार्फत करण्यात चौकशी करण्यात आली असून सदर ठिकाणी भूमापन क्र. 117 हि. क्र.01 येथे कांदळवनाची कत्तल केल्याचे दिसून आलेले नाही.<br>• **त्या अनुषंगाने समितीने सदरची तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले.** | जिल्हाधिकारी पालघर (अहवाल प्राप्त) |
| ६७ | **तक्रार क्र. १३४ श्रीमती श्वेता भट दि.११.०५.२०२०** Destruction of mangroves at Sasunavghar, Vasai, Palghar | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी पालघर (अहवाल अप्राप्त) |

**(अण्णासाहेब मिसाळ)**
**अध्यक्ष,**
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती**
**तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग**